# शिवांकुर विद्यालयाची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**कोंढवड (वार्ताहर)–** राहरी तालुक्यातील कोंढवड येथील शिवांकुर विद्यालयाने इयत्ता दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली असून परीक्षेस बसलेले सर्वच विद्यार्थी चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहे.

शिवांकुर विद्यालयातील विद्यार्थीनी सायली सतीश काळे ही ९२.६० टक्के गुण मिळवून प्रथम आली. चैतन्य संतोष ढोकणे याने ८८.६० टक्के गुण मिळवून दुसरा क्रमांक पटकाविला. तसेच मयुरी रंभाजी ढोकणे हिने ८७.४० टक्के गुण मिळवून तीसरी आली.

या गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब पवार व संस्थेचे सचिव डॉ. प्रकाश पवार यांनी कौतुक केले तसेच पुढील परीक्षेसाठी



शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका छाया जाधव, पर्यवेक्षक अरुण खिलारी, किरण तारडे, सचिन जाधव, भाऊसाहेब करपे, विजय शिंदे, मयूर धूमाळ, प्रियंका पांढरे, सुवर्णा थोरात, प्रिया लांबे, अनिता लांबे, तनुजा झुगे, रोहिणी भाकरे, सुजाता तारडे, सुनिता ढोकणे, रूपाली रासने, अंजली धोंडे, दुर्गा बारवेकर, साक्षी शिंदे, रोहिणी हापसे, शारदा तमनर, अशोक गाडे आदींसह पालकांचे मार्गदर्शन लाभले.

## प्रीतिसुधाजी शैक्षणिक संकुलाची
# १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**राहाता (तालुका प्रतीनिधी)–** राहाता येथील प्रीतिसुधाजी इंटरनॅशनल स्कूलचा केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला आहे. सोबतच पुणे बोर्ड १० वी परीक्षेतही १०० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या शैक्षणिक संकुलातील दहावीतील विद्यार्थीनी विशाखा संदीप शिंदे हिने ९६ टक्के गुण मिळवत स्टेट बोर्ड विभागात प्रथम तर आदित्य अमोल टिळेकर यानेही ९६ टक्के गुण मिळवत सीबीएसई विभागात १० बोर्ड परीक्षेत स्कूलमध्ये प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. स्टेट बोर्ड विभागात नव्वद टक्क्यांहून अधिक गुण मिळविणारे विद्यार्थर्यांमध्ये विशाखा संदीप शिंदे ९६ टक्के, पूर्वा युवराज सदाफळ – ९४ टक्के, पृथ्वीराज रमेश घालमे ९४, भक्ती विठ्ठल साबदे ९४, वेदांत विशाल पवार ९४, सिद्धी भीमराज गुंजाळ ९४, यश अशोक शिवले ९३, धनेश नितीन वसईकर ९२, शिवप्रसाद दिगंबर तळेकर ९२, शिवतेज शंकर भोंडवे ९१, कृष्णा नंदकुमार बिराजदार ९१ टक्के, भावेश उत्तम बोरुडे ९१ टक्के. तर सी.बी.एस.ई.विभागात नव्वद टक्क्यांहून अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी आदित्य अमोल टिळेकर ९६ टक्के, साहील योगेश शिंदे ९५, प्रणव वसंत डाके ९५, तेजस प्रवीण भोजने ९१, सोहम सुनील कोरडे ९०, स्वराली सुनील लोमटे ९० टक्के. या शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशात अशोक गाढवे, रविकिरण पाटील, सचिन गिते, चंद्रशेखर दंडवते, बसवराज पाटील, प्रीतम तोरडमल, जनार्दन साबळे, अश्विनी पवार, आदिनाथ मुनमुने, तुषार वैद्य,महेश वक्ते, वर्षा कापसे, अर्चना पवार आदी शिक्षकांचे मोलाचे योगदान आहे.

# जिजामाता माध्यमिकचा ८४ टक्के निकाल



सोहम पोतदार यश दरंदले श्रेया चिंधे साईराज देशमुख वैष्णवी घोडेचोर

**भेंडा (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्री. मारुतरावजी घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८४.०४ टक्के लागला असल्याची माहिती प्राचार्या डॉ. जयश्री सरवदे–पवार यांनी दिली.

विद्यालयाचे एकूण ३७६ विदयार्थी परिक्षेस बसले होते त्यापैकी ३१६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

**गुणवंत विद्यार्थी – प्रथम** क्रमांक– सोहम शिवप्रसाद पोतदार (९५.८० टक्के), **व्दितीय** – यश रिकेश दरंदले (९५.४० टक्के), **तृतीय** – श्रेया कैलास चिंधे (९५.२० टक्के), **चौथा–** साईराज जयसिंग देशमुख (९४.२० टक्के), **पाचवा** – वैष्णवी नवनाथ घोडेचोर (९३.६० टक्के).

शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील, उपाध्यक्ष माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, विश्वस्त माजी आमदार पांडुरंग अभंग, अ‍ॅड. देसाई देशमुख, सचिव अनिल शेवाळे, सहसचिव रवींद्र मोटे, प्रशासकीय अधिकारी भारत वाबळे, प्राचार्या डॉ. जयश्री सरवदे–पवार, उपप्राचार्य विधाटे, पर्यवेक्षक नितिन मुंगसे व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

# डहाणूकर इंग्लिश मिडीयमची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**टिळकनगर (वार्ताहर)–** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी डहाणूकर इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दहावीत तालुका व जिल्ह्यात अधिकाधिक गुण मिळवून १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली.

या परीक्षेत वैष्णवी किशोर ढोकचौळे हीने ९५.८० टक्के गुण मिळवून प्रथम, युवराज गौरव जगताप ९५.६० टक्के मिळवून द्वितीय, हर्षल अनिल ढोकचौळे ९४.४० टक्के मिळवून तृतीय तर अथर्व अरविंद जगधने व



ध्रुव कैलास सोमाणी यांनी ९३.२० टक्के मिळवून चतुर्थ क्रमांक मिळवला. या परीक्षेसाठी एकूण ३९ विद्यार्थी समाविष्ट होते. त्यापैकी १४ विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये, १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर १ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे टिळकनगर इंडस्ट्रीजचे चेअरमन अमित डहाणूकर, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर शिवानी डहाणूकर, टिळकनगर इंडस्ट्रीजचे व्हाईस प्रेसिडेंट तरुण बेहेल, प्राचार्या प्रियंका खराडकर, प्रशासकीय अधिकारी वंदना हरकल, मुख्याध्यापक रंगनाथ बाहुले, परीक्षा विभाग प्रमुख वैशाली कुलकर्णी, वर्गशिक्षिका सनिल मोल व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व पालकांनी अभिनंदन केले.

# कै. बिहाणी विद्यामंदिर प्रशालेचा ९४.६३ टक्के निकाल

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** राहुरी शहरातील कै. लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशालेने यावर्षी इयत्ता दहावीच्या परीक्षेत निकालाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली असून विद्यालयाचा ९४.६३ टक्के निकाल लागला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. बिहानी विद्यालयाचे २६१ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी २४७ विद्यार्थी यशस्वी ठरले. त्यामध्ये ४३ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणीत, ७८ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत तर ७९ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीत यश मिळवले.

शाळेतील अनुज प्रकाश शिरसाठ याने ९५.८० टक्के (४७६ गुण) मिळवून



विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. ऐश्वर्या निळकंठ मंडलिक हिने ९४.६० टक्के (४७० गुण) मिळवत द्वितीय क्रमांक, तर ओम प्रसाद अडसुरे याने ९२.८० टक्के (४६१ गुण) मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. या यशस्वी विद्यार्थ्यांचे एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा प्रभावतीताई बिहाणी, सचिव मनोज बिहानी, सहसचिव अनुप बिहानी, मुख्याध्यापक कैलास अनाप, उपमुख्याध्यापिका मंजिरी देशपांडे, पर्यवेक्षक आर. जे. पवार तसेच शिक्षकवर्ग व पालकांनी कौतुक केले आहे.

# अशोकनगर येथे भगवान गौतम बुद्ध पौर्णिमा साजरी

**वडाळा महादेव (वार्ताहर)–** तालुक्यातील निपाणी वडगाव येथे भगवान गौतम बुद्धांची जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

बौद्धाचार्य भाऊसाहेब हिवराळे व निवृत्ती पगारे यांनी त्रिसरण, पंचशील, बौद्ध पूजा, भीमस्मरण, भीमस्तुती हे धार्मिक कार्यक्रम घेतले. यावेळी अशोकचे संचालक सोपान राऊत, माजी सरपंच मुरली राऊत, माजी सरपंच रवींद्र पवार, मीराताई पारधे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ओवी प्रसाद काळे या आठ वर्षाच्या मुलीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर पोवाडा सादर केला. प्रसंगी माजी उपसरपंच आबासाहेब राऊत, सरपंच योगीताताई योगेशराव देवकर, उपसरपंच जगन्नाथ जाधव, सामाजिक कार्यकर्ते योगेश देवकर, मीराताई पारधे, बाळासाहेब ढोरमारे, श्री. जाधव, श्री.दांडगे, ज्योतीताई कदम, भैरवनाथ ढोरमारे हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शारदाताई पारखे, छायाताई थोरात, श्यामल जाधव, शारदाताई थोरात, उज्वलाताई जाधव, सविताताई बोरुडे, सीताताई बोरुडे, रोहिणी दांडगे, भिमाबाई येवले, दिपाताई जाधव, उषाताई साळवे, शारदाताई साळवे, पूर्णाबाई थोरात, रोहिणी बोरुडे, पल्लवी थोरात, चंद्रकलाताई थोरात, आशा पारखे, दीक्षाताई साळवे, वैशालीताई काळे, पद्माताई बोराडे, लक्ष्मण मोरे, अजय साळवे, उमेश जाधव, अजय जाधव, दिलीप जाधव, ताराचंद पारधे, रामदास बोरगे, सिद्धार्थ थोरात, सार्थक साळवे, मुरलीधर साळवे, किरण हिवराळे, अतुल बोरुडे, अजय वैरागर, जुबेरभाई सय्यद, संगीता हिवराळे, करूणा हिवराळे, राणी हिवराळे, रंजना दाभाडे, संतोष जाधव, सविता जाधव, सुनिता शिंणगारे, कुसूम त्रिभुवन, शकुंतला साळवे, बेबी शिरसाठ, द्वारका पारखे, लक्ष्मीबाई मकासरे, सुरेखा चक्रनारायण, मंगलाबाई कदम यासह अनेकांनी प्रयत्न केले.

# जिजामाता पब्लिक स्कूलचा ९७ टक्के निकाल

**भेंडा (वार्ताहर)–** येथील श्री. मारुतरावजी घुले पाटील शिक्षण संस्था संचलित जिजामाता पब्लिक स्कूलचा इ.१०वीचा निकाल ९७.१४ टक्के लागला आहे.



हर्षिता वर्मा प्रेरणा चक्रनारायण स्नेहल भराडे

हर्षिता योगेश वर्मा (९० टक्के) ही विद्यालयात प्रथम, प्रेरणा सुधीर चक्रनारायण (८९.८० टक्के) हिने द्वितीय तर स्नेहल रविंद्र भराडे (८६.८० टक्के) हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. एकूण ७० विद्यार्थ्यापैकी २५ विद्यार्थी विशेष प्राविण्य, २७ प्रथम श्रेणीत व १६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आ.नरेंद्र घुले पाटील, उपाध्यक्ष माजी आ.चंद्रशेखर घुले पाटील, विश्वस्त माजी आ. पांडुरंग अभंग, अ‍ॅड देसाई देशमुख, डॉ. क्षितीज घुले, सचिव अनिल शेवाळे, सहसचिव रविंद्र मोटे, प्रशासकिय अधिकारी प्रा. भारत वाबळे, प्रा.डॉ.राजेंद्र गवळी, उपप्राचार्य दीपक राऊत आदींनी कौतुक केले आहे.

# डेरे स्कूलचा दहावी परीक्षेचा शंभर टक्के निकाल

**संगमनेर (तालुका प्रतिनिधी)–** येथील डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील दहावी (एसएससी) बोर्ड परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

यामध्ये आयुषी सुनीलकुमार शुक्ला हिने ९७.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर श्रावणी राधाकृष्ण दिघे ९६.४० टक्के द्वितीय, मधुरा महेंद्र फुले ९५.८० टक्के तृतीय, आर्या गुलाब मंडलिक ९५, आर्या किरण सातपुते ९५ व आयेशा अनिस शेख ९५ टक्के गुण संयुक्तपणे चौथा क्रमांक पटकावला आहे. दहावीच्या तीन तुकड्यांमधून १२० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली व सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तम गुणांनी उतीर्ण झाले आहेत. यामध्ये वीस



विद्यार्थ्यांना ९० टक्के व त्यापेक्षा अधिक, ३३ विद्यार्थी ८० टक्के व अधिक, २८ विद्यार्थी ७० टक्के व अधिक, १९ विद्यार्थी ६० टक्के व अधिक, २० विद्यार्थी ५० टक्के व त्यापेक्षा अधिक असे गुण मिळाले आहेत. संगम सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. भानुदास जी. डेरे, उपाध्यक्ष अ‍ॅड. श्रीराज डेरे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, यंदाही आमच्या शाळेने शंभर टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखली असून याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. हे यश केवळ टक्केवारीपुरते मर्यादित नसून, आमच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले विशेष कौशल्य आणि त्यातून त्यांचा झालेला सर्वांगीण विकास हिच आमच्या शैक्षणिक कार्याची खरी ओळख आहे. या यशाबद्दल संस्थेच्या विश्वस्त अंकिता श्रीराज डेरे, मुख्य कार्यकारी अधिकारी आशालता शेट्टी, प्राचार्या रेखा पवार, प्राथमिक विभाग उपप्राचार्या स्मिता गुंजाळ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियमचा दहावीचा निकाल १०० टके

**राहाता (प्रतिनिधी)–**प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज लोणीचा इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेचा निकाल शंभर टक्के निकाल लागला, अशी माहीती प्राचार्या रेखा रत्नपारखी यांनी दिली.

यामध्ये ऋतुजा सुरेश सिंग लकवाल हिने ९७.४० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक, शाश्वती दीपक गोरडे आणि साईशा देविदास चोखर हिने ९५.२० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर श्रीवल्ली संदीप तुरकणे आणि शरण्या संतोष थेटे हिने ९३.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. बोर्डाच्या परीक्षेत एकूण ७० विद्यार्थिनींपैकी ५० विद्यार्थिनींनी विशेष प्राविण्य प्राप्त केले असून २० विद्यार्थिनी या प्रथम श्रेणीत आहेत विद्यालयातील एकूण १५ विद्यार्थिनींनी ९० च्या वर गुण संपादन केले आहेत.

# आनंद तरंगे यांचे निधन

**कर्जत (प्रतिनिधी)–** येथील प्रसिद्ध डॉक्टर दिनकर तरंगे यांचे चिरंजीव आनंद तरंगे (वय ५२) यांचे अल्पशा आजाराने बडोदा येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई–वडील, भाऊ, पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे.

पान १ वरुन

## बांधकामात कृत्रिम वाळूचा वापर बंधनकारक

भारतीय मानक ब्युरोच्या निकषानुसार गुणवत्ताधारित कृत्रिम वाळूचा वापर करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कृत्रिम वाळू धोरणानुसार प्रत्येक जिल्ह्यात ५० व्यक्ती/ संस्थांना कृत्रिम वाळू युनिट स्थापन करण्यासाठी उद्योग विभाग सवलती देणार आहे.

कृत्रिम वाळू युनिट्समुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी वाढतील. तसेच नैसर्गिक वाळूवरील अवलंबित्व कमी होऊन पर्यावरण रक्षणास हातभार लागेल, असा राज्य सरकारचा विश्वास आहे. यासाठी जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात येणार असून धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र निरीक्षण यंत्रणा तयार केली जाणार आहे. राज्यातील बांधकाम क्षेत्रात या निर्णयामुळे मोठा बदल होण्याची शक्यता आहे.

## अहिल्यानगरचा दहावीचा निकाल ९२ टक्के

मंगळवारी दुपारी १२ वाजता ऑनलाईन जाहीर केला. २०२४ मध्ये जिल्ह्याचा निकाल ९४.५६ टक्के तर २०२३ मध्ये ९३.९० टक्के निकाल लागला होता. २०२४ च्या निकालाच्या तुलनेत यंदा २.७१ टक्के निकाल कमी लागला आहे. सर्वाधिक निकाल संगमनेर तालुक्याचा ९५.५६ टक्के तर सर्वात कमी निकाल ८०.६६ टक्के शेवगाव तालुक्याचा लागला आहे. परीक्षेसाठी ३७ हजार २६२ मुले तर ३० हजार ९६ अशा ६७ हजार ३५८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३६ हजार ९७८ मुले तर २९ हजार ८८० मुलींनी परीक्षा दिली. त्यातून ३३ हजार १७ मुले तर २८ हजार ३९५ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलींचे पास होण्याचे प्रमाण मुलींपेक्षा ६ टक्के जास्त आहे.

जिल्ह्यात दहावी–बारावी परीक्षेदरम्यान यंदा शिक्षण विभागाने कॉपीमुक्त अभियान जिल्ह्यात राबविले. त्यासाठी खास भरारी पथके नियुक्त करण्यात आली होती. त्यामुळे यंदा कॉपीचे प्रमाण खूपच कमी झाले आहे.तत्कालीन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालिमठ व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षणाधिकारी अशोक कडूस व इतर शिक्षण विभागाच्या अधिकार्यांनी यात महत्वपूर्ण योगदान दिले. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याने, तसेच केंद्रनिहाय पथके नेमल्याने कॉपीस आळा बसला आहे.

**श्रीगोंदा, संगमनेर व अकोलेत मुलीचं टॉप**

जिल्ह्यात श्रीगोंदा, संगमनेर व अकोले या तीन तालुक्यात मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. श्रीगोंद्यात ९७.७४, संगमनेरमध्ये ९७.४३ तर अकोल्यात ९७.०३ टक्के मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण आहे.

**एकाचवेळी बाप–लेक उत्तीर्ण**

नगर शहरातील भाई सथ्था नाईट स्कूल या रात्र शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षेता यश मिळवलं आहे. येथील रात्र शाळेमध्ये दहावीचे शिक्षण घेणारे माजी सैनिक अंकुश पानमंद आणि वडापाव विक्रेत्या मंगल रांधवन हे दोघेही उत्तीर्ण झाले आहेत. अंकुश पानमंद यांनी १९ वर्षे देश सेवा केली असून सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर अपूर्ण राहिलेले शिक्षण घेण्यासाठी त्यांनी रात्र शाळेमध्ये प्रवेश घेतला आणि ते यावर्षी दहावी उत्तीर्ण झाले. अंकुश यांना दहावीमध्ये ६० टक्के गुण मिळाले आहेत. विशेष म्हणजे त्यांच्याबरोबर त्यांचा मुलगा साहिल पानमंद हा देखील दहावीला होता, त्याला देखील ७४ टक्के गुण मिळाले आहेत. दहावीच्या परीक्षेत एकाचवेळी बाप–लेक उत्तीर्ण झाल्याने पानमंद कुटुंबीयांचा आनंद द्विगुणीत झाला आहे.

## दिनकर, भालसिंग यांना पुन्हा संधी

तर आ. कर्डिले हे मंत्री विखे यांचे समर्थक मानले जातात. त्यामुळे दोन्ही जिल्हाध्यक्ष हे मंत्री विखे यांच्या गोटातील असल्याची चर्चा आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात महानगर, दक्षिण व उत्तर जिल्हा असे तीन जिल्हाध्यक्ष आहेत. २७ एप्रिल रोजी शिर्डीत पक्षाचे प्रभारी जयकुमार रावल, महानगर जिल्हाध्यक्षपदाचे निरीक्षक पक्षाचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, दक्षिणचे निरीक्षक माजी आमदार बाळासाहेब सानप व उत्तरचे निरीक्षक आमदार विक्रम पाचपुते यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत तिन्ही जिल्हाध्यक्षांच्या कार्यक्षेत्रातील प्रमुख पदाधिकारी, आमदार, खासदार, विविध संस्थांचे पदाधिकारी यांच्याकडून त्यांच्या पसंतीची जिल्हाध्यक्षपदासाठी प्रत्येकी तीन नावे बंद पाकिटात घेण्यात आली. ही बंद पाकिटे प्रदेशकडे पाठविण्यात आली. ज्या नावाला जास्त पसंती आहे. ते नाव जिल्हाध्यक्षपदासाठी जाहीर होईल, असे सांगण्यात आले होते. त्यानुसार ५ मेपर्यंत जिल्हाध्यक्षांची नावे जाहीर होईल अशी अपेक्षा होती. मात्र प्रमुख पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी दिलेल्या नावांबाबत एकमत होत नसल्याने या नियुक्त्या रखडल्या होत्या. मंगळवारी भाजपचे प्रदेश निवडणूक अधिकारी आमदार चैनसुख संचेती यांनी राज्यातील ५८ जिल्हाध्यक्ष व महानगर अध्यक्षांची नावे जाहीर केली. त्यात नगर दक्षिणसाठी भालसिंग तर उत्तरेसाठी दिनकर यांची नियुक्ती केल्याचे जाहीर केले. मात्र नगर शहर जिल्हाध्यक्षपदाची नियुक्ती प्रलंबित ठेवण्यात आली आहे. महानगर जिल्हाध्यक्षपदासाठी सचिन पारखी, बाबासाहेब वाकळे, बाबासाहब सानप यांची नावे आघाडीवर होती. मात्र दोन दिवसांपासून अनिल मोहिते व धनंजय जाधव यांची नावे पुढे आली आहेत. त्यामुळे यापैकी कोण असा प्रश्न पडला आहे. दक्षिण जिल्हाध्यक्षपदासाठी दिलीप भालसिंग, युवराज पोटे, अशोक खेडकर, रवि सुरवसे, बाळासाहेब महाडीक, सचिन पोटरे तर उत्तर जिल्हाध्यक्षपदासाठी जालिंदर वाकचौरे, शिवाजी गोंदकर, नितीन कापसे आदींची नावे चर्चेत होती. उत्तर जिल्हाध्यक्षपदाबाबत फारशी रस्सीखेच नव्हती.

## आमदार लहामटेंच्या वाहनाला विठे घाटात अपघात

त्यांचे निवासस्थानी कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली.

आमदार लहामटे यांनी समाज माध्यमातून आपल्या अपघाताची स्वतः माहिती दिली.विठे घाटात माझ्या गाडीला अपघात झाला. कोणतीही दुखापत झालेली नाही.आपण पूर्णपणे सुखरूप असून राजूर निवासस्थानी आहोत. त्यामुळे कार्यकर्ते, हितचिंतक यांनी काळजी करू नये असे आवाहन त्यांनी केले.

## समुपदेशनाद्वारे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्या सुरू

सेवा पूर्ण झालेले कर्मचारी नसल्याने प्रशासकीय बदल्या न करता केवळ विनंती बदल्यांची प्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर महिला बालकल्याण विभागातील पर्यवेक्षकांच्या ४ प्रशासकीय व ८ विनंती, पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंत्यांच्या २ विनंती तर प्राथमिक शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी या पदावरील १ कर्मचारीची प्रशासकीय तर ५विनंती बदल्या करण्यात आल्या. मागील वर्षी लोकसभा निवडणुकीमुळे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्या होऊ शकल्या नव्हत्या. यंदा, मात्र ग्रामविकास विभागाच्या सूचनानुसार सामान्य प्रशासन विभाग सेवा जेष्ठतेनुसार रिक्त असणाऱ्या जागा बदली पात्र कर्मचाऱ्यांना दाखवून समुपदेशनाने बदलीची प्रक्रिया पार पाडत आहे. आज उद्या विविध विभागाच्या कर्मचाऱ्यांची प्रशासकीय आणि विनंती बदल्या होणार असल्याचे सामान्य प्रशासन विभागाकडून सांगण्यात आले.

## ३५ गावांना वादळाचा तडाखा

मान्सूनपूर्व पावसाचा मुक्काम राहणार असून, यामुळे शेतकऱ्यांनी पिकांसह पशुधन याची काळजी घ्यावी असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्ह्यात ९ ते १२ मे यादरम्यान वादळ सर्वाधिक तडाखा पाथर्डी तालुक्यातील २४ गावांना बसला असून या ठिकाणच्या १०६ शेतकऱ्यांचे ७३.६० हेक्टर वरील पिकांचे नुकसान झालेले आहे. यासह अकोले तालुक्यातील सहा गावात ७३ शेतकऱ्यांची १८.३५ हेक्टर वरील पिकांची नुकसान झालेले असून नगर तालुक्यातील पाच शेतकऱ्यांची पाच हेक्टर वरील पिकांचे नुकसान झालेले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत पाच हजारांहून अधिक हेक्टर वरील पिकांना वादळाचा तडाखा बसलेला असून नुकसान झालेल्या पिकाची पंचनामे करून जिल्हा प्रशासनाला अहवाल सादर करण्यात आल्याचे कृषी विभागाकडून कळविण्यात आले आहे.

**या पिकांचे झाले नुकसान**

जिल्ह्यात गेल्या काही दिवसात आंबा, डाळिंब, मोसंबी, चिकू, मका, कांदा, उन्हाळी बाजरी, मिरची, केळी या पिकांसह फळ बागांचे नुकसान झालेले आहे.

**असे आहे घरांचे नुकसान**

जिल्ह्यात नेवासा तालुक्यात ३, कोपरगाव २, अकोले १ आणि शेवगाव तालुक्यातील २ अशा आठ घरांची पडझड झालेली असून पाथर्डीत दोन म्हशीसह एक गाय दगावली आहे. तर अकोले तालुक्यात झाडपडून एकाचा तर नेवासा तालुक्यात वीज पडून एक अशा दोघांचा मृत्यू झालेला आहे.

## भंडारदरात ३६ दलघफू पाण्याची आवक

झाले होते तर मंगळवारी सकाळपर्यंत ३६ दलघफू पाणी नव्याने दाखल झाले. भंडारदरात सध्या ३८९६ दलघफू (३५.२९टक्के) पाणीसाठा आहे. तर निळवंडेत १८३६ दलघफू (२२ टक्के) पाणीसाठा आहे.

काल मंगळवणारी सायंकाळपर्यंत झालेल्या पावसाची नोंद अशी (मिमी) भंडारदरा २३, घाटघर ४४, पाजरे ३१, रतनवाडी ५१, वाकी २५, अकोले ५४.

## साई मंदिरात अधिकाऱ्यांची मनमानी! कुलूप संस्कृतीला ग्रामस्थांचा विरोध

प्रतिक्रिया उमटत आहेत. गंध तिर्थ व सत्काराच्या सुविधा केवळ अधिकारी वर्गाच्या मर्जीतील भाविकांसाठीच उपलब्ध करून देण्यात येतात. उर्वरित सामान्य साईभक्तांकडे दुर्लक्ष केले जाते. ही गोष्ट अत्यंत दुर्दैवी आहे असे कोते यांनी सांगितले. शिर्डी ग्रामस्थांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांच्या सबुरीचा अंत झाला आहे. आता ग्रामस्थ आणि भाविक एकत्र येऊन प्रशासनाला जाब विचारणार आहेत. मंदिरात मनमानी कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात लढा दिला जाईल, असा इशारा कोते यांनी दिला. मंदिराच्या सध्याच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर कोते यांनी टीका केली. व्हीआयपी पाहुणे आले की सीईओ यांच्या कुटुंबियांना सत्कारासाठी कोणत्या अधिकाराने बोलावले जाते? तसेच आयपीएल सामन्यात कोणत्या अधिकाऱ्यांचे कुटूंबीय व्हीव्हीआयपी कक्षात झेंडा फडकावत होते. यात 'साईराम' होता का ? असा सवाल उपस्थित करून त्याची चौकशी करण्याची मागणी श्री. कोते यांनी केली.